महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

ई–निविदा सुचना

महावितरण तर्फे कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग कार्यालय पुणे अंतर्गत महावितरणचे विविध कार्यालय/ उपकेंद्र येथील स्थापत्य दुरुस्तीची कामे करणेसाठी महावितरणमधील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून T-020/2024-25 ते T-036/2024-25 साठी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा महावितरणच्या संकेतस्थळावर (https://etender.mahadiscom.in/eatApp) दि. १३.०६.२०२४ ते १९.०६.२०२४ पर्यंत सकाळी ११.०० वाजे पर्यंत उपलब्ध आहेत. तसेच निविदा दि. १९.०६.२०२४ रोजी दुपारी १६.०० वाजेपर्यत स्वीकारण्यात येतील. सदर निविदा दि. १९.०६.२०२४ रोजी १६.३० वाजता शक्य असल्यास उघडण्यात येतील. निविदासंदर्भात अधिक माहितीसाठी उप.कार्यकारी अभियंता (स्था) विभाग पुणे भ्रमणध्वनी क्र. ७८७५७६७८२९ वर संपर्क साधावा. निमस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्वीकारणे अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. तसेच कंत्राटदारांना विनंती करण्यात येते की, महावितरण च्या निविदा संकेतस्थळावर आपली नोंदणी करून घ्यावी. तसेच निविदेबाबत काही मुदतवाढ किंवा शुद्धी पत्रकाबाबत फक्त संकेतस्थळावरील – "Announcements" मध्येच कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

स्वा/–

PRO No. PZ/32/24 **कार्यकारी अभियंता (स्था),स्थापत्य विभाग, पुणे**

ग्रामपंचायत डोंगरगाव, ता. मावळ, जि. पुणे

बी–१ खुली निविदा/दरपत्रक अंतर्गत सुचना क्र. १ सन २०२३–२४

ग्रामपंचायत डोंगरगाव, ता. मावळ, जि. पुणे येथील खालील कामाची मोहरबंद निविदा महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग व जि.प. पुणे यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडून २ लिफाफा पद्धतीने खालील कामाची मोहरबंद निविदा / साहित्याची दरपत्रके मागविणेत येत आहे. कोऱ्या निविदांचा नमुना ग्रा.पं. कार्यालय डोंगरगाव, ता. मावळ, जि. पुणे यांच्याकडून दि. १३/०६/२०२४ ते १९/०६/२०२४ रोजी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (सकाळी १०.०० ते सायं. ४.३० वाजेपर्यंत) देण्यात येतील व भरून पाठविलेल्या मोहरबंद निविदा दि. १३/०६/२०२४ ते १९/०६/२०२४ पर्यंत सायं. ४.३० वाजेपर्यंत ग्रा.पं. कार्यालय डोंगरगाव येथे स्विकारल्या जातील व शक्य झाल्यास त्याच दिवशी संध्याकाळी ०५.०० वाजता उघडण्यात येतील.

अ. नं.	कामाचे नाव	कामाची अंदापत्रकीय रक्कम रु.	कोऱ्या निविदाची किंमत रक्कम रु.	इसारा रक्कम रु.	काम पूर्ण करावयाचा कालावधी
१	गटर सफाई नाला सफाई ओढा सफाई आणि इतर सफाई	९९७१०/–	२००/–	९९७/–	१ महिना

टिप :– १) कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रा.पं. ने राखून ठेवला आहे. २) कोणतीही निविदा कारण न देता रद्द अथवा फेरबदल करण्याचा अधिकार ग्रा.पं. ने राखून ठेवला आहे. ३) सदर निविदा मोहोरबंद लिफाफ्यामध्ये स्वीकारल्या जातील. सुट्टीच्या दिवशी निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. ४) सोबत पुढील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. १. नोंदणी प्रमाणपत्र, २. जी. एस. टी. रजिस्ट्रेशन, ३. आयकर प्रत, ४. पॅनकार्ड, ५. इसारा रक्कम कोणत्याही बँकेच्या धनादेशाद्वारे (डी. डी. / एफ.डी.आर) ग्रामपंचायत डोंगरगाव, ता. मावळ या नावाने काढून तो रेखांकित करून सदर (डी.डी./एफ.डी.आर) लिफाफा जा नं. १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्र. २ उघडला जाणार नाही.

सही/–
ग्रामसेवक
ग्रामपंचायत डोंगरगाव, ता. मावळ, जि. पुणे

सही/–
प्रशासक
ग्रामपंचायत डोंगरगाव, ता. मावळ, जि. पुणे

जाहीर नोटीस

जाहीर नोटीस तमाम लोकांस या जाहीर नोटीसेने जाहीर करण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही कै. अशोक परशुराम म्हस्के यांच्या मालकी होती, अशोक परशुराम म्हस्के यांचे निधन दिनांक ०२/०५/२०१० रोजी झाले आहे. त्यांच्या पश्चात कै. अशोक परशुराम म्हस्के यांचे कायदेशीर वारस हे १. अनिता अशोक म्हस्के व २. प्रतीक अशोक म्हस्के, मयत सोबतचे कायदेशीर वारसाचे नाते पत्नी व मुलगा आहे. तरी खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत मयत व्यक्तीच्या पश्चात १. अनिता अशोक म्हस्के व २. प्रतीक अशोक म्हस्के यांच्या मालकी हक्काची व वहीवाटीची आहे तसेच सदर मिळकत त्यांनी आमचे अशिल मे. श्रीराम हाऊसिंग फायनान्स लि. कडे गहाण ठेवण्याचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा गहाण, दान, लीन, लीज, करार, मदार, बक्षीस, वारसा वा इतर कोणत्याही प्रकारे, कसलेही हक्क हितसंबध, अधिकार असल्यास अशा व्यक्तींनी प्रस्तूतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत अस्सल कागदपत्रांनिशी आमची तशी खात्री पटवून द्यावी व त्यापश्चात कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

मिळकतीचे वर्णन : परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन : पुणे महानगरपालिका हद्दीतील गांव मौजे औंध येथील सि.स.नं. ७५९ ते ७६५ या मिळकतीवरील बुट्टेपाटील सदन या नियोजीत इमारती मधील विंग ए मधील तिसऱ्या मजल्यावरील निवासी गाळा/फ्लॅट नं. ३०१ यांसी क्षेत्र ४३.२१ चौ. मी. म्हणजेच ४६५ चौ. फुट बिल्टअप बाल्कनीसह ही मिळकत येणेप्रमाणे जाहीर नोटीस.

सही/–
ॲड. गणेश चव्हाण
ऑफिस नं. ३ पहिला मजला, नवमहाराष्ट्र हाऊस, शनिवार पेठ, पुणे - ४११०३० मो. ९८६००९७६९७

Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project
E-TENDER NOTICE NO (2024_DOAWB_1040835_1)
CONSTRUCTION OF 1000 MT CAPACITY WAREHOUSE BUILDING AND SEED PROCESSING SHED WITH ANCILLARYWORK 191.35 Sq.M

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded (SMART) Project. ***Krushi Sampanna Farmer Producer Company Ltd. Dahid Tq. Dist Buldhana*** is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned works. The estimated cost of work is ***Rs. 152.92 lakhs.*** The bid document is available on the project website **www.smart-mh.org**, in *tender and procurement section*. The last date submission of online bid is **04/07/2024 up to 05:00 PM**. Any updates or notices shall be published on aforementioned website only.

District Implementation Unit, SMART Project Dist : Buldana
Mo. 9850695073, E-mail : krushifpc0421@gmail.com

Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project
E-TENDER NOTICE NO: 2024_DOAWB_1040804
Supply, Installation, Testing and Commissioning of Optical Grader-Cleaning, Grading, Waxing Machine 4 TPH with Optical Grader

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. Apegaon Agro Processor Farmers Producer Company Ltd. is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned Machinery. The bid document is also available on the project website **www.smart-mh.org,** in tender and procurement section. The last date for submission of online bid is **02/07/2024 up to 03:00 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned websites only.

District Implementation Unit,
SMART Project, Dist. Chhatrapati Sambhajinagar.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

E TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E Tender) from registered contractors / agencies on Mahatransco E-Tendering website https://srmetender.mahatransco.in for following works.

Tender No: SE/EHV/O&M/Circle/Pune/**T-05/2024-25**

RFX No. 7000030213.

Subject:- RE-tender (2nd call) for Work of replacement of Control & Relay Panels with supply & laying of control cables at various EHV S/s under EHV O&M Circle, Pune.

(Control & Relay Panels will be provided by MSETCL)

Tender Amount:- Rs. 1,45,03,747/- **EMD:-** Rs. 1,45,037/-,

Tender Fees:- Rs.500/- + GST.

Download of tender documents:- from dtd. 13.06.2024 to dtd-21.06.2024 upto 11:00 hrs.

Bid Opening:- Dtd. 21.06.2024 after 12:00 hrs (Tech) Dtd. 24.06.2024 after 12:00 hrs (Price)

For further details visit our website http://mahatransco.in and open above RFX for downloading tender document, schedules, and annexure.es

Sd/-
Superintending Engineer
EHV O&M Circle, Pune

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, **गाव मौजे वाकड येथील सर्व्हे नंबर १०८/१/३, सर्व्हे नंबर १०८/१/४, सर्व्हे नंबर १०८/१/५, सर्व्हे नंबर १०८/२/१ यावरील बांधलेल्या ''कोर्टयार्ड वन'' या निवासी प्रकल्पातील इमारत कमांक ए यामधील दुसऱ्या मजल्यावरील सदनिका / अपार्टमेंट नंबर २०४ यांसी कार्पेट क्षेत्र ६१४ चौ. फुट म्हणजेच ५७.०४ चौ. मी. अधिक बाल्कनी व अधिक टेरेस अधिक फ्लोअर बेड क्षेत्र २११ चौ. फुट म्हणजेच १९.६० चौ. मी. एक कार पार्किंगसह ही मिळकत सौ. आशा रविंद्र इंगवले** यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे वहिवाटीची मिळकत आहे. सदर मिळकत त्यांना बक्षीसपत्राने प्राप्त झालेली आहे. सदर मिळकत त्यांनी पूर्वीचे मालक श्री. समीर काशिनाथ वाकडकर यांचेकडुन रितसर नोंदणीकृत बक्षीसपत्र दस्तान्वये घेतलेली आहे (सदर समीर काशिनाथ वाकडकर हे सौ. आशा रविंद्र इंगवले यांचे सख्खे भाऊ आहेत) पूर्वीचे मालक समीर काशिनाथ वाकडकर यांना सदर मिळकत ही विकसनाचे मोबदल्यापोटी विकसक मे. कोर्टयान वन व्हेंचर्स एलएलपी तर्फे अधिकृत स्वाक्षरी अधिकारी रघु अय्यर यांचेकडुन ताबापावती दस्त नंबर १३७/२०२३ सह दुय्यम निंबधक हवेली २६ दिनांक ०४/०१/२०२३ अन्वये मिळालेली आहे.

सदर मिळकत सौ. आशा रविंद्र इंगवले यांचे नावे बक्षीसपत्राने हस्तांतरीत केल्यानंतर सदर समीर काशिनाथ वाकडकर यांनी सदर मिळकतीचे चैन डाक्युमेंट/दस्ताचे मूळ प्रती मूळ नोंदणी पावती व मूळ सुची क्रं. २ सह सौ. आशा रविंद्र इंगवले यांना दिलेल्या होत्या. सबब सदर ताबापावती दस्त नं. १३७/२०२३ दुय्यम निबंधक हवेली नंबर २६ हा मूळ दस्त, मूळ पावती व मूळ सुची क्रं. २ सह सौ. आशा रविंद्र इंगवले यांचेकडुन गहाळ झालेला आहे. व तशी दिनांक ११/०६/२०२४ रोजी रितसर सांगवी पोलिस स्टेशन येथे मूळ दस्त पावती व सुची क्रमांक २ सह गहाळ झालेबाबत तक्रार नोंदविलेली असून यांसी प्रॉपटी मिसिंग ऑकरन्स रिपोर्ट रजिस्ट्रर नंबर २६३/२०२४, स्टेशन अ. २३/२०२४ असा आहे. सबब सदर दस्ताचा त्यांनी कोठेही दुरूपयोग केलेला नसुन ती कुठल्याही बँकेत, फायनान्स कंपनीत अथवा सावकाराकडे तारण ठेवलेला नाही.

सदर मूळ दस्त पावती सुची क्रं. २ सह कोणालाही मिळाल्यास खालील पत्त्यावर सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाचे आत आणून द्यावा अन्यथा सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडुन दिलेला आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील त्या नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.
दिनांक १२.०६.२०२४

ॲड. श्री. आकाश कचरू कांबळे,
शॉप नंबर ए १ गावडे मेन्शन सहकारी गृहरचना संस्था मर्यादीत, गावडे पेट्रोल पंपा मागे, गावडे नगर, चिंचवड, पुणे – ४११०३३. मो. नं. ७८७५९२१३७७/ ८२०८४८८९६७

जाहीर नोटीस

या जाहीर नोटिसी व्दारे तमाम लोकांस कळविण्यात येते की खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत **श्री. अरुण घनश्याम दिघे व सौ. वर्षा अरुण दिघे** यांच्या मालकीची असून सदर मिळकत त्यांनी मे. ए. स्केअर यांच्याकडून दि. २७/१२/२०१८ रोजीच्या करारनाम्यान्वये विकत घेतलेली असून सदर करारनामा दुय्यम निबंधक, हवेली क्र. १६ यांच्या कार्यालयात अनुक्रमांक २०२१४/२०१८ अन्वये नोंदविलेला असून तो गहाळ झालेला आहे. त्याबाबत श्री. अरुण घनश्याम दिघे यांनी पुणे पोलीसांच्या ऑन-लाईन पोर्टल वर अलंकार पोलीस स्टेशन, यांचेकडे दि. १२/०६/२०२४ रोजी एल आर नंबर ८०७०५ - २०२४ अन्वये कागदपत्रे गहाळ झालेबाबत तक्रार नोंदविलेली आहे. तरी, जर यदाकदाचित वर नमूद केलेल्या दस्तऐवजाची मूळ प्रत कोणास सापडल्यास सदर दस्तऐवज नोटीस देणार वकील यांच्या कार्यालयात सात (७) दिवसांत खालील पत्त्यावर आणून द्यावेत.

परिशिष्ट : तुकडी पुणे पोट तुकडी ता. हवेली येथील मे. दुय्यम निबंधक हवेली यांचे कार्यक्षेत्रामधील मौजे वारजे येथील स.नं. १४४ या मिळकतीवरील मायरा एनक्लेव्ह इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील गाळा क्र. शॉप १०४ यांसी क्षेत्र २५० चौ.फुट बिल्ट-अप म्हणजेच २३.२३ चौ.मी. कळावे.

दि. १२/०६/२०२४ **सही/–**

ॲड. योगेश दि. माकणे,
फ्लॅट नं. ५ सी, लक्ष्मी नारायण नगर नं. ५,
पटवर्धनबाग, एरंडवणा, पुणे ४११००४,
मोबाईल : ९९२१२६८६१६/८६२३९५१५७६
Email: yogesh.makane@gmail.com

जाहीर नोटीस हरकत

तमाम लोकांना या जाहीर नोटीस हरकत द्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील १.श्री प्रसन्न शरद चांदगुडे, २. सौ. स्मिता अभिजीत सुर्यवंशी (बेडके), ३. प्रकाश दिनकर चांदगुडे, यांचे मार्फत जाहीर नोटीस हरकत पुढीलप्रमाणे- दैनिक पुढारी- पुणे आवृत्ती ॲड. विकास पडवळ यांचे मार्फत अशील कै.दिनकर चांदगुडे यांचे मयत वारस १. कै . सिंधु शरद चव्हाण (मयत) तर्फे वारस अ. बिपीन शरदराव चव्हाण, ब. जयंद्र शरदराव चव्हाण, क. प्रविण शरदराव चव्हाण, ड. ज्योती दिपक सरनाईक व इ. पोर्णिमा चंद्रकांत मोटे २. उषा जयसिंग पवार ३. विमल बाबुराव चव्हाण, ४. पुष्पा आत्माराम माने, ५. आशा रामदास नवले, ६. विदया धनाजी जाधव (मयत) तर्फे वारस अ. ऋषीकेश धनाजी जाधव, ब. चेतन धनाजी जाधव यांनी दैनिक पुढारी पुणे, बारामती वर्तमानपत्रामध्ये पान नं. ८ दिनांक ०३/०६/२०२४ रोजी प्रसिध्द केलेली जाहीर नोटीस यास सक्त हरकत आहे. नोटीसमध्ये नमुद परिशिष्ट मिळकत वर्णन गाव मौजे काळखैरेवाडी ता. बारामती जि. पुणे गट नं. ४३४ क्षेत्र ३ हे. १५ आर पो.ख. ० हे ०६ आर एकुण ३ हे. २१ आर आकार ५ रु. ७३ पै. या मिळकतीबाबत वरील नमुद बिपीन चव्हाण व इतर यांनी आमचे अशीलांचे अपरोक्ष महसुल ७/१२ इतर हक्कामध्ये असणारी नावे भोगवटादार सदरी बेकायदेशीरपणे तहसिलदार बारामती यांचेकडील एकतर्फा आदेश क्र. १५५ एस. आर ६३/२०२४ अन्वये मंडल अधिकारी सुपा, ता. बारामती जि. पुणे. यांचेकडील फे. फा. नं. ७००० दिनांक २२/०५/२०२४ रोजी मंजुर केलेला दिसुन येत आहे. यामध्ये आमचे अशील यांना कोणतीही नोटीस तहसिलदार यांनी बजावलेली नव्हती. त्यामुळे सदर फे.फा.नं. ७००० हा मुलतः बेकायदेशीर व एकतर्फा असल्यामुळे याबाबत आमचे अशील हे योग्य न्यायालयात आव्हान देणार आहेत. तसेच वरील नमुद जमीन मिळकत हि आजही आमचे अशीलांचे कब्जेवहिवाटीमध्ये आहे. त्यामुळे वरील जाहीर नोटीस प्रसिध्द करणार यांचा या मिळकतीमध्ये कधीही कब्जेवहिवाट नव्हती व नाही. असे असताना वरील नमुद मिळकतीबाबत मे. दिवाणी न्यायालय बारामती यांचे कोर्टात रे.दि.मु.नं. २६०/२०१४ हा दिवाणी दावा प्रलंबित असुन त्यामध्ये वरील इसम हे पक्षकार म्हणुन सामील आहेत. हि सर्व बाब जाहीर नोटीसमध्ये लपवण्यात आलेली आहे. त्यामुळे वरील नमुद मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणीय व्यवहार जसेकी, गहाण, दान, लीज, लीन, बक्षिस, विल, करार, मदार, करु नये अगर केलेस तो आमचे अशीलांवर बंधनकारक असणार नाही. तसेच याबाबत खरेदीघेणार यांना वरील नमुद मिळकतीचा कायदेशीर ताबा मिळणार नाही. याची सक्त दखल घ्यावी व याउपर कोणतेही दस्तऐवज तिऱ्हाईत इसम यांनी अस्तित्वात आणलेस यास आमचे अशील योग्य त्या दिवाणी व फौजदारी न्यायालयामध्ये दाद मागतील याची सर्वस्वी जबाबदारी हि खरेदी घेणार व देणार यांची राहिल. सबब वरील जाहीर नोटीस यास हरकत नोटीस द्वारे उत्तर असे. सबब येणेप्रमाणे जाहीर नोटीस उत्तर असे.

ठिकाण- बारामती
दिनांक १२-०६-२०२४

सही/–
ॲड. सचिन संभाजीराव शिंदे बी.एस.एल.एल.एल.बी.
रामकुंड टॉवर्स, तहसिल कार्यालय शेजारी
फलटण, जि. सातारा. ४१५५२३ मो. नं. ९४२३८८०१११

कामगार राज्य विमा महामंडळ
(श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार)
EMPLOYEES' STATE INSURANCE CORPORATION
(Ministry of Labour and Employment, Govt. of India)

क.रा.बी.नि.
ESIC

उप प्रादेशिक कार्यालय, पंचदीप भवन, सर्वे नं. ६८९–६९०, बिबवेवाडी, पुणे, महाराष्ट्र–४११०३७.
Sub-Regional Office, Panchdeep Bhawan,
Survey no. 689/690, Bibvewadi, Pune,
Maharashtra- 411037.
Phone: 020-24211138/39, Fax: 020-24215153,
Email: dir-pune@esic.nic.in

वर्गणीच्या प्रस्तावित रकमेच्या निर्णयाविरुद्ध सुनावणीची संधी

खाली नमूद करण्यात आलेल्या कंपनी मालकांचे लक्ष त्यांच्या नावासमोर उल्लेखित वर्गणीच्या रकमेकडे वेधण्यात येत आहे. यापूर्वी त्यांना देण्यात आलेल्या संधीचा त्यांनी लाभ न घेतल्याने कलम ४५ (अ) नुसार त्यांच्या अनुपस्थितीत आदेश जारी करण्यापूर्वी त्यांना वैयक्तिक सुनावणीची अंतिम संधी देण्यात येत आहे.

अ. क्र.	विमा शाखा	कंपनी मालकाचे नाव आणि पत्ता	कोड क्र.	सूचना दिल्याची तारीख	रक्कम (₹ मध्ये)	सुनावणीची आता नक्की करण्यात आलेली तारीख
१	IV	**मेसर्स हस्तशिल्प डिझायनर क्रेट प्रा. लि.,** GAT नं. १४५, मंगलूर एमआयडीसी, मंगलूर, एस्सार स्टीलच्या शेजारी, ताल मावळ, पुणे–४१२४११.	३३०००५२७७ ४००००९९९	सी–१८ (तदर्थ) ०१.०३.२०२४	₹ १,११,८०४/–	१४.०६.२०२४
२	VI	**मेसर्स एस्पायर अल्फा क्वालिटी सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेड,** फ्लॅट क्रमांक A३/२३, सुभाष पार्क, चिंतामणीनगर, हांडेवाडी रोड, हडपसर, पुणे–४११०२८.	३३०००६५३५ ४००००६९९	सी–१८ (तदर्थ) ०७.०५.२०२४	₹ २,७४,८९०/–	१९.०६.२०२४
३	II	**मेसर्स आशिर्वाद इनोव्हेटीव कोटिंग्स प्रा. लिमिटेड,** ज्योतिबा नगर, गेट नंबर ६९, प्लॉट नंबर १, तलावडे, पुणे–४१११४.	३३०००४५८४ ८००००३९९	सी–१८ (तदर्थ) ०६.०७.२०२३	₹ ४,१५८/–	१४.०६.२०२४

कृपया याची नोंद घ्यावी की, वर नमूद केलेल्या तारखेस सुनावणीची संधी न घेतल्यास कलम ४५–अ नुसार अनुपस्थितीत (एक्स–पार्टी) आदेश जारी करण्यात येईल.

स्वाक्षरी/–
(प्राधिकृत अधिकारी)

एकदाच विमा क्रमांक घ्या, कितीही वेळा रोजगार बदला केव्हाही, कुठेही, हितलाभ मिळवत रहा!

ICICI Home Finance

कॉर्पोरेट कार्यालय : आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी – कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०५९, भारत.

शाखा कार्यालय : कार्यालय क्र १०१, १ ला मजला, फॉरच्यून बिझनेस सेंटर, ॲम्बियन्स हॉटेलजवळ, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे – ४११ ०५७.

नियम ८ (६) च्या तरतुदी पाहा
अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी सूचना

सीक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्सिअल ॲसेट्स आणि इन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ तसेच त्यासह वाचा सीक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ८ (६) अंतर्गत तरतुदींच्या अनुसार अचल मालमत्तांच्या ई –लिलाव विक्रीकरिता सूचना.

याद्वारे आम जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदार यांना सूचित करण्यात येते की, खालीलप्रमाणे नमूद केलेल्या मालमत्ता या संरक्षित धनको यांच्याकडे तारण ठेवण्यात आल्या आहेत तसेच त्यांच्यावर धनको यांचा भार आहे आणि त्यांचा **प्रत्यक्ष ताबा** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड यांच्या प्राधिकृत अधिकारी यांनी घेतला आहे आणि त्यांची विक्री " जसे आहे जिथे आहे " , " जसे आहे जे आहे " तत्त्वानुसार आणि खालीलप्रमाणे देण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार करण्यात येणार आहे.

अ. क्र.	कर्जदार / सह कर्जदार / हमीदार / कायदेशीर वारसदार यांचे नाव आणि कर्ज खाते क्रमांक	संरक्षित मालमत्तेचा तपशील त्यावर असलेल्या भारांसह असल्यास	येणे असलेली रक्कम	राखीव किंमत इसारा रक्कम ठेव	मालमत्तेच्या पाहणीची तारीख आणि वेळ	लिलावाची तारीख आणि वेळ
ए	बी	सी	डी	इ	एफ	जी
१	अविनाश नंदकुमार बडे (कर्जदार), अक्षय नंकुमार बडे (सहकर्जदार) कर्ज खाते क्र. : एनएचबीएमटी ००००१२७०८९२ व एनएचबीएमटी ००००८३२०१८	फ्लॅट क्र. ३०२, ३ रा मजला, श्री साई अपार्टमेंट, पद्मावती नगरजवळ, प्लॉट क्र. ६, इंदापूर २१५ पार्ट, जुना सर्व्हे क्र ४३०, इंदापूर ४१३१०६.	रु. १३,७४,२७४/– दि. ०४ जून, २०२४	रु. १६,०३,८००/– रु. १,६०,३८०/–	२६ जून, २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	०३ जुलै २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००
२	अजिंक्य माधव कुलकर्णी (कर्जदार), माधव रघुनाथ कुलकर्णी (सहकर्जदार) कर्ज खाते क्र. : एलएचएडीआर ००००१२१८७०४	फ्लॅट क्र. ८०९, ८ वा मजला, ''स्कायवॉटर'', गट क्र. ६०, बावधी रोड, मौजे वाघोली, तालुका हवेली, पुणे – ४१६०२८.	रु. २४,९८,००५/– दि. ०४ जून, २०२४	रु. २६,८४,६६४/– रु. २,६८,४७०/–	२६ जून, २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	०३ जुलै २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००
३	प्रशांत के. नेरकर (कर्जदार), सुधीर के. नेरकर (हमीदार) कर्ज खाते क्र. : एलएचपीयूएन ००००१४६२२५८	दुकान क्र ४, तळमजला, ''सूरज टॉवर'' नावाने प्रस्तावित इम रतीतील, सर्व्हे क्र. १६/९/१, आंबेगाव बुद्रुक, पुणे येथील.	रु. १०,२४,३६१/– दि. ०४ जून, २०२४	रु. ११,९०,७००/– रु. १,१९,०७०/–	२६ जून, २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	०३ जुलै २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००

ऑनलाइन लिलाव प्रक्रिया ही आमची लिलाव एजन्सी **ग्लोबल टेक** यांचे संकेतस्थळ (**यूआरएल लिंक** – https://BestAuctionDeal.com) यांच्या माध्यमातून घेण्यात येईल. तारणदार / सूचना देण्यात येत आहे की, त्यांनी एकूण येणे असलेली रक्कम अधिक त्यावरील व्याज आणि अन्य शुल्क दिनांक **२ जुलै, २०२४** रोजी **संध्याकाळी ५.०० पर्यंत** अदा करावे.त्यास्तव ही शेवटची संधी आहे, अन्यथा संरक्षित मालमत्तांची विक्री वरीलप्रमाणे नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार करण्यात येणार आहे.

प्रस्तावित बोलीदार यांनी ईएमडी रक्कम आरटीजीएस / धनाकर्ष (डीडी) यांच्या माध्यमातून (रकाना ई चा संदर्भ घ्यावा) **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, कार्यालय क्र १०१, १ ला मजला, फॉरच्यून बिझनेस सेंटर, ॲम्बियन्स हॉटेलजवळ, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे – ४११ ०५७** येथे **०२ जुलै, २०२४ रोजी संध्याकाळी ४.००** वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी अदा करावी. कृपया नोंद घ्यावी की, प्रस्तावित बोलीदार वरीलप्रमाणे नमूद केलेल्या वेळापत्रकाअनुसार आणि वेळेत आपली बोली सादर करू शकणार नसतील तर निविदा प्रपत्र **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड,कार्यालय क्र १०१, १ ला मजला, फॉरच्यून बिझनेस सेंटर, ॲम्बियन्स हॉटेलजवळ, कस्पटी वस्ती, वाकड, पुणे – ४११ ०५७** येथे **०२ जुलै, २०२४ रोजी संध्याकाळी ५.००** वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी सादर करता येईल. ईएमडी रकमेच्या संदर्भात धनाकर्ष (डीडी) हा राष्ट्रियीकृत बँकेचा / शेड्युल बँकेचा आणि ''**आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड– लिलाव**'' यांच्या नावे आणि **पुणे** येथे देय असावा.

वरीलप्रमाणे नमूद केलेल्या संरक्षित मालमत्तांच्या संदर्भात पाहणी करण्यासाठी यापुढील अधिक स्पष्टीकरणासाठी, तसेच लिलावाच्या संदर्भात अटी आणि शर्ती यांची माहिती जाणून घेण्यासाठी आणि निविदा सादर करण्याच्या संदर्भातील अधिक माहिती जाणून घेण्यासाठी कृपया **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड – ९९२०८०७३००** किंवा आमचे **विक्री आणि विपणन भागीदार नेक्सेन सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड** यांच्याशी संपर्क साधावा.

कोणतीही किंवा सर्व बोली कोणतेही कारण न देता फेटाळून लावण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. विक्रीच्या संदर्भातील सविस्तर अटी आणि शर्ती जाणून घेण्यासाठी कृपया https://www.icicihfc.com/ येथे भेट द्यावी.

दिनांक : १३ जून, २०२४
स्थळ : इंदापूर, पुणे

प्राधिकृत अधिकारी
आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड

जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली फ्लॅट मिळकत श्री. जगजोत सिंग मागो व सौ. इंदरमीत कौर मागो रा. फ्लॅट नं. १०२, प्रीन्सटोन फ्लेअर, लेन नं. ८, ऑपो अशोका चक्र बिल्डिंग, कोरेगाव पार्क, पुणे ४११००१ यांचे स्वकष्टार्जित खरेदी मालकी हक्क व ताबे वहिवाटीची असून त्यांनी खाली नमुद फ्लॅट मिळकत आमचे अशिलास भाग भरणा स्वीकारून कायमस्वरूपी विक्री करण्याचे ठरविले आहे.

सदरील फ्लॅट मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास तिचे पूर्ण मार्केटेबल टायटल आहे, असा भरवसा व खात्री त्यांनी आमचे अशिलास दिलेला आहे. तथापि सदरील फ्लॅट मिळकतीवर विद्यमान मालकांचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही गहाण, दान, ताबा, बँक बोजा, लेखी करार, कोर्ट ॲटॅचमेंट, लिज, लिन, विसारपावती, साठेखत, खरेदी करार, कुळ हक्क, कोर्ट वाद, डिक्री, पोटगी हक्क, बक्षिस व वारसाहक्क तसेच इतर कोणताही कायदेशीर हक्क हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री करून द्यावी. मुदतीमध्ये हरकत न आल्यास सदरील फ्लॅट मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा काही एक हक्क अधिकार नाही, असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

'परिशिष्ट' : तुकडी व जिल्हा पुणे, पोट तुकडी व तालुका हवेली, मे. दुय्यम निबंधक हवेली (पुणे) यांचे कार्यक्षेत्रातील तसेच पुणे महानगरपालिका यांचे हद्दीतील गाव मौजे वडगावशेरी येथील स. नं. ७ हिस्सा नं. १ ते ५ स. नं. ८ हिस्सा नं. १/१/२ स.नं. ३८ ए हिस्सा नं. १ बी / १, १ए स. नं. ३८ बी स. नं. ३ हिस्सा नं. २ यांसी एकूण क्षेत्र २१ हेक्टर ९३.०४ आर या मिळकतीवर बांधलेल्या एफ - रेसिडेन्सेस स्कीम मधील तथा एफ रेसिडेन्सेस टॉवर नं. १, २, ३, ४ विंग I को - ऑपरेटीव्ह हाऊसिंग सो. लि. मधील टॉवर नं. ३ मधील पहिल्या मजल्यावरील युनिट नं. १०५ यांसी क्षेत्र १०८.७८ चौ. मी. कारपेट व टेरेस क्षेत्र ४८.०६ चौ. मी. तसेच ग्राऊंड लेवल वरील कार पार्किंग नं. एसपी २७४ ही मिळकत सर्व हक्क अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त फ्लॅट ही मिळकत या नोटिसीचा विषय आहे.

सही/–
पुणे, ता. ११.०६.२०२४ **ॲड. सुजाता ए. परदेशी,**
पत्ता : स.नं. ४९, ऑफिस नं. १२, पठारे स्कुल जवळ, भाजी मार्केट, चंदननगर, पुणे ४११०१४. मो. नं. ७५०७३५१२७३

जाहीर खुलासा

तमाम लोकांना विशेषतः गाव म्हणजे बोडके नगर, जुन्नर ता. जुन्नर जि. पुणे व आसपासच्या लोकांना ॲड. तय्याबखान युसुफखान पठाण, राहील कॉम्प्लेक्स नेहरू बाजारपेठ, जुन्नर जि. पुणे यांनी सौ. सुजाता संतोष कबाडी (लग्नापूर्वीचे नाव सुजाता खंडू शिंदे) यांचे मार्फत दिनांक ०२/०६/२०२४ रोजी दैनिक पुण्यनगरी मध्ये दिलेल्या जाहीर नोटीसला जाहीर खुलासा देण्यात येतो तो खालील प्रमाणे : गाव कसबे शहर बोडकेनगर, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे येथील सिटी सर्वे नंबर ५२३७ ही मिळकत सुजाता संतोष कबाडी यांचे मालकीची होती. सदरील मिळकत सुजाता संतोष कबाडी यांनी दिनांक २८/०५/२०१३ रोजी सौ. स्नेहल दिलीप वाळके यांना विकसन करारनामा व मुखत्यारपत्रानुसार विकसन करण्यास दिली होती. सदरील क्षेत्र विकसन करून त्यावर कायदेशीररीत्या तळमजला व दोन मजले बांधण्यात आले आहेत. सुजाता संतोष कबाडी यांचे तर्फे मुखत्यार सौ. स्नेहल दिलीप वाळके यांनी सदरील इमारतीमध्ये पहिल्या व दुसऱ्या मजल्यावरील सदनिका क्रमांक दोन व तीन या श्री. आनंद ज्ञानेश्वर शेळकंदे यांना विक्री केल्या आहेत. त्याप्रमाणे श्री. आनंद ज्ञानेश्वर शेळकंदे यांची सदरील सदनिका क्रमांक दोन व तीन मध्ये मालकी हक्काने वहिवाट होती. सदरील इमारतीमधील तळमजल्यावरील सदनिका क्रमांक १ ही सौ. सुजाता संतोष कबाडी यांना देण्यात आली होती. आमच्या आशिलांनी सदरील इमारतीमधील तळमजल्यावरील सदनिका क्रमांक १ सौ. सुजाता संतोष कबाडी यांच्याकडून दिनांक ०४/१०/२०१८ रोजी खरेदी केली आहे. श्री. आनंद ज्ञानेश्वर शेळकंदे यांनी वर नमूद सदनिका क्रमांक २ व ३ या बजाज हाऊसिंग फायनान्स लि. कडे कर्ज घेऊन गहाण ठेवल्या होत्या. सदर सदनिका या वृत्त संस्थेने जप्त केल्या व लिलावामध्ये आमच्या अशिलांनी खरेदी केले आहेत अशा प्रकारे संपूर्ण इमारत म्हणजेच सदनिका क्रमांक १,२,३ मध्ये आमच्या अशिलांनी मालकी हक्काने ताबे वहीवाट आहे. त्यानंतर जुन्नर नगर परिषद म्यू. मि.क्र ZAB2000535, ZAB2006152, ZAB2006153 चे उताऱ्यास आमच्या अशिलांची नोंद झाली आहे व त्याचा कर आमचे अशिलांनी भरला आहे.

सौ. सुजाता संतोष कबाडी यांचा वर नमूद मिळकतीचे मालकी वहिवाटीशी काहीही हक्क व संबंध राहिलेला नाही व त्यांना आमच्या अशिलांचे विरुद्ध जाहीर नोटीस देण्याचा कोणताही अधिकार नाही. आमचे अशिल सदरील मिळकतीचे (भू सहित) मालक व वहिवाटदार आहेत व त्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे सदरील मिळकतीचा उपभोग घेण्याचा कायदेशीर अधिकार आहे व सौ. सुजाता संतोष कबाडी यांनी लोकांची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने व आमच्या अशिलांचे आर्थिक व मानसिक नुकसान व्हावे या उद्देशाने जाहीर नोटीस प्रसिद्ध केले आहे.

तरी कोणाहीची फसगत होऊ नये व दिशाभूल होऊ नये म्हणून आमचे अशिल सदर जाहीर खुलासा प्रसिद्ध करीत आहेत.

सही/–
जुन्नर, १३/०६/२०२४ **श्री. ज्ञानदेव म्हातारबा बेल्हेकर तर्फे,**
ॲड. सुमित निकम
२३, कल्याणपेठ, जुन्नर, जि. पुणे. मो. नं. ९८२२०२५२३५

ग्रामपंचायत खामगाव, ता. जुन्नर, जि. पुणे

जाहीर निविदा

निविदा सूचना क्र. ३ सन २०२३/२४ ग्रामपंचायत खामगाव, ता. जुन्नर, जि. पुणे यांचे तर्फे पात्र नोंदणीकृत कंत्राटदार यांजकडून दोन लिफाफा पद्धतीने खालील कामांच्या निविदा मागविण्यात येत आहेत.

अ. क्र.	कामाचे नाव	निविदा रक्कम (रु.)	निविदा फी (रु.)	इसारा रक्कम (रु.)	कामाचा कालावधी	कंत्राटदार वर्ग
१	खामगाव मांगनेवाडी स्मशानभूमी सुधारणा करणे.	९,९९,४९८.००	५९०.०० (प्रत्येकी)	१% (प्रत्येकी)	३ महिने	जि.प.पुणे नोंदणीकृत सुबे/ वर्ग ५
२	खामगाव शिवेचीवाडी स्मशानभूमी सुधारणा करणे.	९,९९,७९८.००				
३	खामगाव नेहरकरवस्ती स्मशानभूमी सुधारणा करणे.	९,९९,९२५.००				
४	खामगाव खालची शिवेचीवाडी दशक्रिया वेटींग शेड बांधणे	९,९९,३५७.००				
५	खामगाव भुंडेवाडी तान्हाजीनगर म्हसोबा देवस्थान रस्ता करणे.	९,९९,९८२.००				
६	खामगाव ढोबळेवस्ती रस्ता काँक्रीट करणे.	५,००,०००.००				
७	खामगाव आहेरवस्ती ते केनोल रस्ता काँक्रीट करणे.	५,००,०००.००				

सूचना :– १) निविदा प्रसिद्ध दिनांक व वेळ १३/०६/२०२४ सकाळी १०.०० पासून. २) निविदा स्वीकारण्याचा अंतिम दिनांक व वेळ २०/०६/२०२४ सकाळी १०.०० पर्यंत ३) निविदा उघडणेचा दिनांक व वेळ २०/०६/२०२४ सकाळी १०.०० पासून किंवा सक्षम अधिकारी ठरवतील त्याप्रमाणे उघडण्यात येईल. कोणतीही निविदा कारण न देता नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

सही/–
ग्रामसेवक
ग्रामपंचायत खामगाव, ता. जुन्नर, जि. पुणे

सही/–
सरपंच
ग्रामपंचायत खामगाव, ता. जुन्नर, जि. पुणे

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

RE-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/ agencies on Mahatransco E-Tendering website https://srmetender.mahatransco.in for following works

Tender No.: - EE/PCDN/Tech/01/2024-25 **RFX No.** 7000031427

Work: - Annual Maintenance Contract (AMC) for overhauling & servicing of 22kV/ 33kV ABB make Circuit breakers at various substations under EHV O&M Pimpri Chinchwad Division, Pune.

Tender Amount:- Limited to Rs 13,00,000/-, **EMD: -** Rs. 13,000/-,

Tender Fee: - Rs.500.00/-+ GST

Download of tender documents: - From dtd. 12.06.2024 to dtd.19.06.2024 upto 18:00hrs.

Bid Opening: - dtd. 20.06.2024 after 10:00hrs (Tech Bid) dtd. 21.06.2024 after 10:00hrs (Price Bid)

For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ and open **above RFX** for downloading tender document, schedules and annexures.

Sd/-
Executive Engineer (Charge),
EHV O&M Division, Pimpri Chinchwad.

जावक क्रमांक १८५५/२०२४ सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग, पुणे वाडिया कॉलेजसमोर, ४५-२, कै. बाळकृष्ण सखाराम ढोले पाटील मार्ग, पुणे - १ दि. ०८/०५/२०२४

चौकशीची जाहीर नोटीस

एस. आर. एन. क्रमांक : PUN/1306/18/24
फेरफार अहवाल / अर्ज क्रमांक : १०४/२०२४
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक **स्वप्निल नागवे फाऊंडेशन बाबत...**
न्यासाचा पत्ता :- एस नं. ३५/३, मोरेश्वर कॉलनी, चिंचवडे नगर, पुणे, पुणे, पुणे
अर्जदार – स्वप्नील बसान्ना नागवे

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटिशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, पुणे, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत :–

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन)

अ.क्र.	तपशील	अंदाजे मूल्य
१	CASH	३०००.००

(अ) जंगम मिळकत :– रोख रु. ३०००/– मात्र (अक्षरी रुपये तीन हजार मात्र फक्त)

स्थावर मिळकत (वर्णन)

अ.क्र.	शहर किंवा गांव	सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र.	क्षेत्र	मूल्यांकन	मुदत/कालावधी किंवा स्वरूप	अंदाजे मूल्य

(ब) स्थावर मिळकत :– रोख रु. /– मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०८–०५–२०२४ रोजी दिली.

शिक्का

सही/–
अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसी अन्वये कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली फ्लॅट मिळकत आमचे अशिल अनिता काशिनाथ राठोड, रा. उमरेवाडी, बीड-४३११२४ यांनी विकत घेण्याचे ठरविलेले असून, त्यापोटी सदरील मिळकतीचे विद्यमान मालक प्रविण नामदेवराव ताजणे, रा. कोथरूड, पुणे यांनी सदर फ्लॅट मिळकतीचा व्यवहार आमचे अशिल यांच्या बरोबर खरेदीबाबतची बोलणी केली आहे व त्याकामी विसाराची रक्कम रुपये ५१,०००/- ऑनलाईनद्वारे ट्रान्सफर केलेली आहे उर्वरित रक्कम ही खरेदीखताच्या वेळेस देण्याचे ठरले आहे. तसेच खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे टायटल क्लिअर असल्याबाबत तसेच सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा आमचे अशिलांना दिलेला आहे, याची खात्री करण्यासाठी सदरची जाहीर नोटीस आमचे अशिलांनी प्रकाशित केलेली असून, सदर मिळकतीमध्ये कोणाचाही, कुठल्याही प्रकारचा हिस्सा, हिल्ला, हरकत वाटा, कायदेशीर संबंध, लेखी अथवा तोंडी करार, मदार, खरेदी विक्री, गहाण, दान, लिज, लीन, बक्षीस, चोळी-बांगडी, पोटगी, मुखत्यार व कोर्ट दरबार अथवा कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास, त्याची खातरजमा व त्याचा कायदेशीर संबंध आमचे अशिलांना योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर समक्ष अथवा लेखी अर्ज देवून ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांपर्यंत कळवावी. दिलेल्या वेळेत कोणतेही हरकत प्राप्त झाली नाही, तर सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी समजण्यात येईल व आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार करतील.

मिळकतीचे वर्णन : तुकडी पुणे, पोट तुकडी, ता. पुणे शहर, मे. दुय्यम निबंधक हवेली यांचे कार्यक्षेत्रातील, पिंपरी महानगरपालिका यांचे हद्दीतील गाव मौजे रहाटणी काळेवाडी येथील स.नं. ७१, हि.नं. ३ए/१५ वरील बांधलेली इमारत 'रोहित पार्क।।' मधील पाचव्या मजल्यावरील फ्लॅट नं. ५०५ यांसी क्षेत्र ६५९.४७ चौ.फुट कारपेट म्हणजेच ८५७ चौ. फुट म्हणजेच ७९.६५ चौ.मी. बिल्टअप कव्हर्ड कार पार्किंगसहीत. चतु:सीमा : पूर्वेस : दक्षिणेस : पश्चिमेस : उत्तरेस :

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे. ठिकाण : पुणे, दिनांक : १२/०६/२०२४

सही/–
ॲड. पी. बी. राठोड, ॲड. एस. आय. जाधव
पत्ता : मारुती मंदिर, सह्याद्री लॉज समोर, जुना तोफखाना, गेट नं. ४ शिवाजी नगर कोर्ट, शिवाजी नगर, पुणे - ४११००५ मो.नं. ९७६६७३३७४२ / ७६६६१९५६६२

पुणे येथील मे. V. M. Mankhair सो. ६ वे सह दिवाणी न्यायाधीश सिनिअर डिव्हिजन यांचे कोर्टात

किरकोळ अर्ज नं. : ८४०/२०२४
निशाणी : ०७

जाहीर नोटीस

Mr. Jitendra Dattatray Bhanap ... अर्जदार

विरुद्ध

Nil ... जाब देणार

नोटीस देण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी इंडियन सक्सेशन ॲक्ट १९२५ कलम ३७२/बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये या कोर्टाकडे **मयत Mr. Dattatray Madhav Bhanap मृत्यू दिनांक १२/०९/२०२२** यांचे **सक्सेशन सर्टिफिकेट** मिळण्यासंबंधीचा अर्ज केलेला आहे.

ज्या कोणास सदरहू अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्यांनी **नेमलेली तारीख २३/०७/२०२४ रोजी ठीक सकाळी ११.०० वाजता** स्वतः किंवा वकिलांमार्फत या कोर्टात हजर रहावे.

आज दिनांक ११/०६/२०२४ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

शिक्का

हुकूमान्वये,
सही/–
अधीक्षक
दिवाणी न्यायालय, पुणे

पुणे येथील मे. एस. बी. पराते, न्यायाधीश कौटुंबिक न्यायालय क्र. यांचे कोर्टात

पीअे. क्र. १७५/२०२३
निशाणी : ११
पुढील दिनांक १२/०७/२०२४

जाहीर नोटीस

चंद्रकांत कांताराम चौधरी ... **अर्जदार**

विरुद्ध

संगीता चंद्रकांत चौधरी ... **जाब देणार**
व्दारा बाळासाहेब निंबाळकर,
नवरंग मित्र मंडळ जवळची इमारत, जंगीशा तालिम, हमाल पंचायत मंदिर, नानापेठ, पुणे
दुसरा पत्ता : घर नं. ६१७ घोरपडी पेठ, सायकर कॉम्प्लेक्स, खडकमाळ आळी, पुणे ४११०४२.

ज्याअर्थी वरील अर्जदार, चंद्रकांत कांताराम चौधरी यांनी जाब देणार संगीता चंद्रकांत चौधरी यांच्या विरुध्द हिंदू विवाह कायदा १९५५ चे कलम १३ (1) (ia) अन्वये घटस्फोट मिळणेकामी अर्ज केलेला आहे. त्याअर्थी या जाहीर नोटिसीद्वारे जाब देणार, संगीता चंद्रकांत चौधरी यांना कळविण्यात येते की, तुम्ही स्वतः **दिनांक १२/०७/२०२४** रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात सदरहू प्रकरणी जाब देण्यासाठी जातीने हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत एकतर्फा हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ११.६.२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

दिनांक ११/०६/२०२४
ठिकाण : पुणे.

शिक्का

हुकूमावरून,
सही/–
उपप्रबंधक
कौटुंबिक न्यायालय, पुणे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, गाव मौजे मळे ता. भोर जि. पुणे येथील गट नंबर १७१ याचे क्षेत्र २६ हे ९९ आर अधिक पोटखराबा १६ हे १९ आर एकूण क्षेत्र ४३ हे १८ आर, आकार १३ रु. ०० पैसे पैकी काळूराम गणपत मळेकर यांचे हिश्याचे क्षेत्रापैकी आमचे अशिलांना विक्री करावयाचे क्षेत्र ० हे २० आर यासी चर्तुसीमा पुढीलप्रमाणे : **पूर्वेस :–** प्रबुध्द केशव परदेशी यांचा याच गटातील मालकी रस्ता व मिळकत, **दक्षिणेसः–** तुषार दिलीप झगडे व चंदा अब्दुल नईम शेख यांची याच गटातील मिळकत, **पश्चिमेस :–** भगवान गणपत मळेकर यांची याच गटातील मिळकत, **उत्तरेस :–** प्रबुध्द केशव परदेशी यांची याच गटातील मिळकत,

ही मिळकत त्यांनी आमच्या अशिलांना खरेदी देण्याचे निश्चित केले आहे. सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. सदर मिळकतीवर कोणाचाही हक्क हितसंबंध, वारसाहक्क, बोजा, लिज, लिन, बक्षीसपत्र पोटगी, करारनामा खरेदीखत कुलमुखत्यारपत्र, विसारपावती व इतर तत्सम स्वरुपाचा बोजा असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाचे आत मूळ कागदपत्रांनिशी खालील पत्त्यावर समक्ष भेटून खात्री करून द्यावी अन्यथा ज्या कोणाचा वरील स्वरूपाचा हक्क अगर हितसंबंध असेल त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशील सदरचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही कसलीही तोंडी अथवा लेखी तक्रार हरकत चालणार नाही याची नोंद घेणेत यावी.

दि. १०/०६/२०२४ **सही/–**

Adv. Hema B. Gandhi
Office:- 472, More All, Bhor Tal. Bhor, Dist Pune Mob. 8087604374

पुणे येथील मे. V. M. Mankhair सो. ६ वे सह दिवाणी न्यायाधीश सिनिअर डिव्हिजन यांचे कोर्टात

किरकोळ अर्ज नं. : ७५०/२०२४
निशाणी : ०७

जाहीर नोटीस

Mrs. Kishori Vinayak Kulkarni ... अर्जदार

विरुद्ध

Nil ... जाब देणार

नोटीस देण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी इंडियन सक्सेशन ॲक्ट १९२५ कलम ३७२/बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये या कोर्टाकडे **मयत Mr. Vinayak Govind Kulkarni मृत्यू दिनांक २५/०१/२०२३** यांचे **सक्सेशन सर्टिफिकेट** मिळण्यासंबंधीचा अर्ज केलेला आहे.

ज्या कोणास सदरहू अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्यांनी **नेमलेली तारीख १३/०७/२०२४ रोजी ठीक सकाळी ११.०० वाजता** स्वतः किंवा वकिलांमार्फत या कोर्टात हजर रहावे.

आज दिनांक ११/०६/२०२४ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

शिक्का

हुकूमान्वये,
सही/–
अधीक्षक
दिवाणी न्यायालय, पुणे

बारामती येथील मे. ४थे सह. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, यांचे कोर्टात जि. पुणे मे. श्री.व्ही.व्ही. देशमुख कोर्ट

कि. अर्ज नं. ४१/२०२४
नि.नं. ९

जाहीर नोटीस

१. सुनंदा नवनाथ आंधळे
२. आर्यन नवनाथ आंधळे अ.पा.क. आई सुनंदा नवनाथ आंधळे दोघे रा. सिध्दीविनायक अपार्टमेंट, फ्लॅट नं. ६, अभिषेक हॉटेल जवळ, भिगवण रोड, जळोची, बारामती, ता. बारामती, जि. पुणे ... **अर्जदार**

विरुद्ध

कोणीही नाही ...**जाब देणार**

तमाम लोकांस, या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. उपरोक्त अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ यांचे वडील कै. नवनाथ दिपक आंधळे (पूर्वी रा. सिध्दीविनायक अपार्टमेंट, फ्लॅट नं. ६, अभिषेक हॉटेल जवळ, भिगवण रोड, जळोची, बारामती, जि. पुणे) यांचे दि. २५.०९.२०२३ रोजी ससून जनरल हॉस्पिटल, पुणे येथे निधन झाले. कै. नवनाथ दिपक आंधळे यांचे पश्चात अर्जदार हेच एकमेव वारस असून नगरपरिषद बारामती, घरपट्टी, शैक्षणिक, शासकीय निमशासकीय ठिकाणी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सबब अर्जदारांनी कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकामी मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तुम्हांस तमाम लोकांस याद्वारे फर्मविण्यात येत आहे की, सदर अर्जाचे कारण दाखविण्याकरिता दि. २३ जुलै २०२४ रोजी ठीक ११.०० वाजता या न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उपरोक्त अर्जाची एकतर्फा सुनावणी घेवून निकाल दिला जाईल.

तारखेस किंवा त्यापूर्वी बजावणी करिता पत्ता देण्यात कसूर केल्यास तुमचा बचाव विचारात घेतला जाणार नाही.

आज दिनांक १२.०६.२०२४ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

हुकूमावरून
सही/–
सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर,
बारामती

पुणे येथील मे. V. M. Mankhair सो. सह. दिवाणी न्यायाधीश सिनिअर डिव्हिजन यांचे कोर्टात

जाहीर नोटीस

किरकोळ अर्ज नं. ७२५/२०२४
निशाणी : ७

Mr. Yateen Vishnu Joshi & others 3
R/at. :- C-101, Silver Crest, Shivtirthanagar, Kothrud, Pune - 411038 **...अर्जदार**

विरुद्ध

NIL **...जाब देणार**

नोटीस देण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी इंडियन सक्सेशन ॲक्ट अन्वये या कोर्टाकडे **मयत** Vasundhara Vishnu Joshi and Vishnu Keshav Joshi **मृत्यू दिनांक** ०७/०४/२०२३ and २२/०३/२०१८ यांचे **लेटर्स ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन** मिळण्यासंबंधीचा अर्ज केलेला आहे.

ज्या कोणास सदरहू अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल, त्यांनी नेमलेली तारीख १०/७/२०२४ रोजी ठीक सकाळी ११.०० वाजता स्वतः किंवा वकिलांमार्फत या कोर्टात हजर राहावे.

आज दिनांक १२/०६/२०२४ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

शिक्का

हुकूमान्वये,
सही/–
अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, पुणे

Appendix H, No. 4
Civil Court Senior Division Vadgaon Maval
IN THE COURT OF SHRI. R.A. SHINDE CIVIL COURT SENIOR DIVISION VADGAON MAVAL, Mawal, Pune.

NOTICE TO SHOW CAUSE.
(GENERAL FORM)
Spl.C.S./1130/2022 EXH No. - 37
Phulabai Sudam Navghane Vs Ajit Jalindar Choudhari
NEXT DATE : 21-06-2024

To,
3) Nitin Govind Sabale
At. C-3, Kohinoor Estate, Pune-Mumbai Highway, Wakadewadi, Dist. Pune.

Whereas in the above-named has made application to this Court that

You are hereby warned to appear in this Court in person or by a pleader duly instructed on the **21-06-2024 at 11:00 O'clock in the forenoon,** to show cause against the application, failing wherein, the said application will be heard and determined ex parte.

Given under my hand and the seal of the Court, this **14-03-2024**

Seal
CIVIL COURT SENIOR DIVISION VADGAON MAVAL

Appendix H, No. 4
Civil Court Senior Division Vadgaon Maval
IN THE COURT OF SHRI. R.A. SHINDE CIVIL COURT SENIOR DIVISION VADGAON MAVAL, Mawal, Pune.

NOTICE TO SHOW CAUSE.
(GENERAL FORM)
Spl.C.S./1130/2022 EXH No. - 38
Phulabai Sudam Navghane Vs Ajit Jalindar Choudhari
NEXT DATE : 21-06-2024

To,
4) Bhikaji Aanandrao Tambe
At. C-3, Kohinoor Estate Pune-Mumbai Haighway, Wakdewadi, Dist. Pune.

Whereas in the above-named has made application to this Court that

You are hereby warned to appear in this Court in person or by a pleader duly instructed on the **21-06-2024 at 11:00 O'clock in the forenoon,** to show cause against the application, failing wherein, the said application will be heard and determined ex parte.

Given under my hand and the seal of the Court, this **14-03-2024**

Seal
CIVIL COURT SENIOR DIVISION VADGAON MAVAL

जाहीर नोटीस

पिंपरी येथील मे. व्ही.एन. गायकवाड सो. ८ वे सह. दिवाणी न्यायाधीश सिनिअर/ ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

रे. दिवाणी दावा क्रमांक २२५/२०२३
निशाणी क्र. २२

शंकर मल्लप्पा करजगी व इतर ६.
रा. १०/११०, नेताजी नगर, वानवडी, पुणे ४११०४०. **......वादी**

विरुद्ध

प्रतिवादी नं. २ अजित शंकरराव जक्कल
रा. फ्लॅट नं. २२, श्रीहाइट्स, जुनी सांगवी, पुणे ४११०२७. **......प्रतिवादी**

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्या विरुद्ध दिवाणी वाद दाखल केला आहे, म्हणून सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी तुम्हाला याद्वारे दिनांक २७/०६/२०२४ रोजी मध्यान्ह ११.०० वाजता या न्यायालयात जातीने हजर राहण्यासाठी बोलावण्यात येत आहे, व बचावाच्या पुष्ट्यार्थ तुम्ही ज्यांचा आधार घेऊ इच्छिता असे सर्व दस्तऐवज त्या दिवशी रुजू करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे.

उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास, तुमच्या गैरहजेरीत वादांची सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल याची दखल घ्यावी.

तसेच तुम्हाला अशीही दखल देण्यात येत आहे की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पूर्वी तुम्ही बजावणीसाठी तुमचा पत्ता दाखल न केल्यास, तुमचा बचाव रद्द होणेस पात्र ठरेल.

आज दिनांक १२/०६/२०२४ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

शिक्का

हुकूमान्वये,
सही/–
सहा. अधीक्षक,
दिवाणी व फौजदारी न्यायालय, पिंपरी

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या जमीन मिळकतींचे विद्यमान मालक श्री. हनुमंत बबन चौधरी, श्री. युवराज बबन चौधरी, दोघेही रा. आंबळे, ता. मावळ, जि. पुणे यांच्या मालकीची सदर मिळकत आमचे अशिलांना कायम खुषखरेदी देण्याचे ठरविलेले आहे. त्यानुसार आमचे अशिलांची मालकांबरोबर बोलणी झालेली आहेत. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी, बोजारहित असल्याचा भरवसा व खात्री त्यांनी दिलेला आहे. सदर मिळकतीवर कोणाचाही बक्षीस, गहाण, दान, लीज, पोटगी, चोळीबांगळी, खरेदी, साठेखत, करार-मदार, कुळ-वहिवाट, विसारपावती, अन्य तत्सम दस्तऐवज इत्यादी कोणत्याही स्वरूपाचा हक्कसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांसह खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर मिळकतीत असे कोणाचेही हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत, असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल व नंतर कोणाचीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

परिशिष्ट मिळकत

तुकडी पुणे, पोट तुकडी ता. खेड, जिल्हा परिषद पुणे, पंचायत समिती खेड, यांच्या कार्यक्षेत्रातील मे. सब रजिस्ट्रार साहेब, खेड यांच्या हद्दीतील व तसेच ग्रामपंचायत तोरणे बु.।। यांचे हद्दीतील मौजे गाव तोरणे बु.।।, ता. खेड, जि. पुणे येथील जमीन मिळकत गट नं. ३३० पैकी विद्यमान मालकांचे खाते नं. २२८१ वरील संपूर्ण हिश्याचे क्षेत्र ०० हे ६० आर यांसी आकार ०२ रु. ०३ पैसे येणेप्रमाणे जमीन मिळकत ही या नोटिसचा विषय असे.

दिनांक : ११/०६/२०२४.

स्वाक्षरित/–
ॲड. निलेश बाळासाहेब देशमुख
राजगुरूनगर, ता. खेड, जि. पुणे.,
मोबा. नं. ९९२२६७२१४२